# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.12.2025** **वार- रविवार**

---

**सावली पेरूया**

पुणे जिल्हा परिषद आणि सह्याद्री देवराई फाउंडेशननं खेड तालुक्यातील धानोरी इथल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, चला- सावली पेरूया, या विशेष कार्यक्रमाचं आयोजन नुकतंच केलं होतं. विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाबाबत आदराची भावना निर्माण करणं, त्यांच्यात पर्यावरण संवर्धनाचा संस्कार पेरणं हा या उपक्रमाचा होता. या कार्यक्रमात सह्याद्री देवराई फाऊंडेशनचे संस्थापक, अभिनेते सयाजी शिंदे यांनी मुलांना मार्गदर्शन केलं.

**भीमाकोरेगाव**

कोरेगाव भीमा विजयस्तंभ शौर्यदिन सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयायांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता सर्व विभागांनी घ्यावी अशी सूचना सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी आज केली. शौर्यदिन सोहळ्याच्या अनुषंगानं झालेल्या बैठकीत ते बोलत होते. समाजकल्याण आयुक्त दिपा मुंडे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, पोलिस अधीक्षक संदिपसिंह गिल, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**मतदारजनजागृती**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नेतृत्वात स्वीप कार्यक्रमांतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम सुरू आहे. या अंतर्गत चिखली येथील संतपीठ परिसरात 'मतदानाची दिंडी' काढण्यात आली. प्रत्येक मतदाराने मतदान करणे हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचा संदेश या दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला.

<u>Pcmc</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरली जाणारी ईव्हीएम यंत्र आणि निवडणूक अनुषंगिक साहित्य बीड आणि कोल्हापूर जिल्ह्यातील संबंधित तालुक्यांतून काल पिंपरीमध्ये सुरक्षितरीत्या आणण्यात आलं. पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या सुसज्ज स्ट्राँग रूममध्ये ही सर्व ईव्हीएम यंत्रे सुरक्षित ठेवण्याचं नियोजन करण्यात आलं आहे.

<u>**आमआदमीपक्ष**</u>

पुण्यासह राज्यातील विविध महापालिकांमध्ये आम आदमी पक्ष महाविकास आघाडीसमवेत निवडणूक न लढवता स्वतंत्रपणे लढवणार असल्याचं पक्षाने जाहीर केलं आहे. आम आदमी पक्ष पुण्यात १००हून अधिक उमेदवार रिंगणात उतरवणार असल्याचं प्रदेश प्रवक्ते मुकुंद किर्दत यांनी सांगितलं. 'आप' ने पुण्यात ४१ उमेदवारांची घोषणाही केली असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमियात म्हटलं आहे.

<u>**निवडणूक**</u>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासमवेत महापालिका निवडणूक एकत्रित लढण्याची चर्चा संपुष्टात आल्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांची जागावाटपासंबंधी बैठक झाली. या बैठकीमध्ये

प्राथमिक स्तरावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या तिन्ही पक्षांना प्रत्येकी ५०, तर महाविकास आघाडीतील समविचारी मित्र पक्षांसाठी १५ जागा देण्याचा ठरवण्यात आलं आहे, असं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>बारामती</u>**

बारामती इथल्या विद्या प्रतिष्ठानच्या शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचं उद्घाटन आज आघाडीचे उद्योजक गौतम अदानी यांच्या उपस्थितीत झालं. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>पुरस्कार</u>**

आयुष्य कितीही गुंतागुंतीचं असलं, तरी कलांच्या माध्यमातून जीवन जगण्याची उमेद मिळते, कलेच्या साधनेतून आपलं व्यक्तीमत्वही प्रगल्भ होत जाते, असं प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री, डॉ. संगीता बर्वे यांनी आज पुण्यात केलं. रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे मराठीतील आद्य शायर भाऊसाहेब पाटणकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणारा पुरस्कार कवयित्री, गझलकार प्राजक्ता पटवर्धन यांचा आज बर्वे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी त्या बोलत होत्या. अभिनेते किरण यज्ञोपवीत यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. भाऊसाहेब पाटणकर यांची गझल म्हणजे जीवनाविषयीचं संखोल चिंतन आहे, असं मत किरण यज्ञोपवीत यांनी व्यक्त केलं.

**<u>बाजारसमिती</u>**

**<u>पुणे</u>** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध  राज्यातून सुमारे 110 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने हिरवी मिरची आणि सिमला मिरचीचे भाव वाढले आहेत. पालेभाज्यांची आवक चांगली असून जवळपास सर्वच पालेभाज्यांच्या भावात दहा टक्क्यांपर्यंत घसरण झाली आहे. थंडीमुळे फळ बाजारात लिंब आणि कलिंगड या रसाळ फळांना मागणी नसल्याने दर खाली

आले आहेत. फुल बाजारात सध्या मंदीचं वातावरण असून जवळपास सर्वच फुलांच्या भावात निम्म्याने घसरण झाली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज 10 अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. उद्याही किमान तापमान साधारण असंच राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**